संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : संजय गुंदेचा

किंमत १ रुपया अहमदनगर, बुधवार दिनांक २८.२.२००७ अंक नं. १७४ वर्ष ५० वे दैनिक





रावसाहेब पटवर्धन स्मारक समितीच्या वतीने आंतरराष्ट्रीय किर्तीचे होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. अमरसिंह निकम (पुणे) यांचे 'असाध्य रोगांवर होमिओपॅथी प्रभावी उपचार पद्धती' या विषयावर व्याख्यान झाले. समवेत सौ. सुधा निकम, डॉ. प्रभाकर पवार, स्मारक समितीचे अध्यक्ष प्र. ह. शितोळे, उपाध्यक्ष भास्कर बांगर आदी. (छाया : दत्ता इंगळे, नगर.)

# आजार हा शत्रू किंवा वाईट नाही तो शरीरसंपदा जतनासाठी सावध करतो

## डॉ. अमरसिंह निकम

नगर– आजार हा शत्रू किंवा वाईट नाही. तो आपली शरीरसंपदा जतन करण्यासाठी सावध करतो. रुग्णांची आजाराची भीती चिकित्सकांनी प्रथम घालावी, असे आवाहन पुण्याच्या आदित्य होमिओपॅथी हॉस्पिटल व हिलिंग सेंटरचे संस्थापक डॉ. अमरसिंह निकम यांनी केले.

रावसाहेब पटवर्धन स्मारक समितीच्यावतीने सहकार सभागृहात त्यांचे 'असाध्य रोगांवर होमिओपॅथी प्रभाव व उपचार पद्धती' या विषयावर त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी डॉ. निकम यांच्या मातोश्री श्रीमती लिलावती, पत्नी सुधा, कन्या डॉ. सुचित्रा, डॉ. प्रभाकर पवार आदि व्यासपीठावर उपस्थित होते.

वैद्यकीय क्षेत्रातील विविध घटनांचा, कसोटी प्रसंगांचे किस्से सांगून मानवी कल्याण - उत्तम आरोग्य संपदाने साधता येते हीच खरी परमेश्वरी सेवा असल्याचे सांगून होमिओपॅथी उपचार पद्धतीचे त्यांनी रुग्णांना पुनरुज्जीवन देण्याची चैतन्यदायी शक्ती असल्याचे सांगितले.

विविध प्रकारच्या चाचण्यांतून अखेर शस्त्रक्रियेपर्यंत रुग्णांना आणून रुग्णांवर तुटून पडून त्यांचे रक्तशोषण, आर्थिक शोषण करण्याच्या वैद्यकीय क्षेत्रातील काही उपचार पद्धतीवर टीका करुन रुग्णांवर उपचार घेण्याऐवजी संशोधनापोटी रुग्णास लाखो रुपयांचा आर्थिक फटका बसूनही त्याच्या जीवनाची शाश्वती नसल्याबद्दल तीव्र खंत व्यक्त केली. वैद्यकीय सेवेतील मानवी कल्याणाचे उद्देश लोप पावून आर्थिक पिळवणुकीच्या प्रकाराबद्दल त्यांनी चीड व्यक्त केली.

स्मारक समितीचे अध्यक्ष प्र. ह. शितोळे यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष भास्करराव बांगर यांनी सूत्रसंचालन केले. जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.